क्रमांक : १३४

# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

### सोमवार, दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२/ कार्तिक ३०, १९४४ शके

### महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पहिल्या टप्प्यातील तारांकित स्वीकृत प्रश्नांच्या सदस्यनिहाय बॅलट पध्दतीबाबत

**१३५.** सर्व मा.सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेतील तारांकित प्रश्नांच्या प्रचलित बॅलट पध्दतीनुसार विधानपरिषदेच्या अधिवेशनाकरिता मा.सदस्यांकडून पहिल्या टप्प्यात प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्न सूचनांपैकी तारांकित स्वीकृत प्रश्न सूचनांचे सदस्यनिहाय बॅलट मा.सदस्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत QIS या संगणकीय प्रणालीद्वारे घेण्यात येते. सदरहू बॅलटप्रसंगी उपस्थित असलेल्या मा.सदस्यांच्या तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट पाच फेऱ्यांमध्ये (१+२+३+५+उर्वरित) घेण्यात येते व सदर बॅलटसाठी प्रश्न सूचना दिलेल्या मा.सदस्यांपैकी अनुपस्थित असलेल्या मा.सदस्यांच्या तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट अशाच प्रकारे पाच फेऱ्यांमध्ये तद्नंतर लगेच घेण्यात येते. तसेच अनुपस्थित सदस्यांच्या तारांकित स्वीकृत प्रश्नांचा क्रम बॅलटसाठी उपस्थित असणाऱ्या मा.सदस्यांच्या बॅलटच्या प्राथम्यक्रमानंतर अनुक्रमे घेण्यात येतो.

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२० च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनापासून पहिल्या टप्प्यातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट मा.सदस्यांच्या प्रत्यक्ष उपस्थिती ऐवजी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगकरिता वापरण्यात येणाऱ्या Zoom app द्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येत आहे.

मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या मान्यतेनूसार महाराष्ट्र विधानपरिषदेच्या यापुढील सर्व अधिवेशनांमध्ये मा.सदस्यांकडून पहिल्या टप्प्यात प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्न सूचनांपैकी तारांकित स्वीकृत प्रश्न सूचनांचे सदस्यनिहाय बॅलट QIS या संगणकीय प्रणालीद्वारे मा.सदस्यांच्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगवरील ऑनलाईन उपस्थितीत घेण्यात येईल.

**विधान भवन, मुंबई.**
**दिनांक : २१ नोव्हेंबर, २०२२**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

**प्रति,**

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व मा.सदस्य
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी, सर्व कक्ष व MKCL कक्ष